राज्यातील 'कोविड सेंटर'मधील महिलांवर अत्याचार सुरूच

कोरोनाग्रस्त महिलेची 'मेडिकल को-ऑर्डिनेटर'कडून छेडछाड

मुंबई, १४ एप्रिल (प्रतिनिधी) : मुंबईतील एका हॉटेलमध्ये विलगीकरणात असलेल्या महिलेसोबत छेडछाड झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला असून, हा प्रकार महाराष्ट्र सरकारच्या महिला सुरक्षा धोरणाचे धिंडवडे काढणारा आहे, अशी प्रतिक्रिया अनेकांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी तत्काळ योग्य ती पावले उचलत 'मेडिकल को-ऑर्डिनेटर' असलेल्या सरफराज मोहम्मद खान या आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत.



अंधेरीतील संतापजनक प्रकार

प्राप्त झालेल्या माहितीनुसार, पनवेलच्या निवासी असलेल्या महिलेला काही दिवसांपूर्वी कोरोना संसर्गाची बाधा झाली होती. ही महिला अंधेरीतील एका हॉटेलमधील 'क्वारंटाईन सेंटर'मध्ये दाखल झाली होती. 'क्वारंटाईन सेंटर'मधून घरी परतण्याच्या वेळी तिच्यासोबत 'मेडिकल को-ऑर्डिनेटर' असलेल्या व्यक्तीने छेडछाड केल्याचा आरोप महिलेने केला आहे. आरोपी सरफराज मोहम्मद खान याच्या विरोधात 'एमआयडीसी' पोलिसांनी गुन्हा दाखल करत त्याला अटक केली असून, या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे. पीडित महिलेचा कोरोना टेस्ट रिपोर्ट ७ एप्रिल रोजी 'पॉझिटिव्ह' आला होता आणि तेव्हापासून ही महिला अंधेरीतील एका हॉटेलमध्ये तयार करण्यात आलेल्या 'क्वारंटाईन सेंटर'मध्ये होती.

मुंबईत कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता अनेक ठिकाणी 'क्वारंटाईन सेंटर्स' उभारण्यात आली आहेत. यामध्ये अनेक हॉटेल्स, शासनाच्या इमारतींचाही समावेश आहे. अशाच प्रकारे अंधेरीतील या हॉटेलमध्येही 'क्वारंटाईन सेंटर' उभारण्यात आले आहे आणि कोरोनाबाधित रुग्णांना तेथे ठेवण्यात येते. मात्र, 'क्वारंटाईन' असलेल्या बाधित महिलेसोबत असा प्रकार घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. यापूर्वीही महाराष्ट्रातील विविध भागांत अशा प्रकारे कोरोनाबाधित महिलांसोबत छेडछाड झाल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. पनवेल, मीरारोड इथे 'कोविड सेंटर'मध्ये झालेले बलात्कार, पुण्यात 'कोविड सेंटर'मध्ये स्त्री डॉक्टरवर झालेला बलात्कार, मानखुर्द, नागपूरसारख्या अनेक शहरातील 'कोविड सेंटर'मध्ये दाखल करण्यात आलेल्या कोरोनाबाधित महिलांवर अत्याचार झाल्याच्या अनेक दुर्दैवी घटना संतांची भूमी असलेल्या या महाराष्ट्रातही नजीकच्या काळात घडल्या आहेत. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

अधिकाऱ्यांवरही तत्काळ कडक कारवाई करण्यात यावी

''मागील वर्षीपासून आतापर्यंत राज्यातील 'कोविड सेंटर'मध्ये विनयभंगाच्या १४ तर बलात्काराच्या चार घटना घडल्या आहेत, जी बाब पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी नाही. अशा प्रकारच्या घटना वारंवार होणे हे संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार आणि हलगर्जीपणाचे लक्षण आहे. प्रत्येक वेळी या प्रशासकीय अधिकारीवर्गाला पाठीशी घालण्याचे काम महाविकास आघाडी सरकारने केले आहे. अशा प्रकरणात जर एकदा कारवाई झाली तर त्यातून नक्कीच एक चांगला संदेश समाजात जाईल. अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी संबंधित आरोपींसोबतच जबाबदार प्रशासकीय अधिकाऱ्यांवरही तत्काळ कडक कारवाई करण्यात यावी, ही आमची प्रमुख मागणी आहे.'' अशी प्रतिक्रिया भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी व्यक्त केली आहे.

राज ठाकरेंचे पंतप्रधानांना पत्र

राज्याला स्वतंत्र लस खरेदी करू देण्याची पत्राद्वारे मागणी

मुंबई, १४ एप्रिल (प्रतिनिधी) : राज्यात दिवसेंदिवस कोरोना रुग्णांची संख्या वाढत असून त्याचा ताण राज्यातील आरोग्य यंत्रणांवर पडायला सुरुवात झाली आहे. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे. राज्यात वाढणारी कोरोना रुग्णांची संख्या आणि लसीचा होत असलेला तुटवडा यामुळे मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिले आहे.

''देशाच्या विविध भागांवर कोरोना प्रादुर्भावाचा विपरित परिणाम झाला आहे. संसर्गाला नियंत्रित करण्यासाठी प्रत्येक राज्याला तिथल्या स्थानिक परिस्थितीनुसार धोरण आखण्याची गरज आहे. 'आरोग्य' हा विषय राज्यांचा आहे. म्हणून केंद्राने राज्याला केवळ परवानगीच नाही, तर स्थानिक

परिस्थितीला अनुसरून योग्य ती उपाययोजना आखण्यासाठी प्रोत्साहनच द्यायला पाहिजे. यामुळे प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे उपाय केले जातील, ज्यातून एकमेकांना शिकण्याची संधीही मिळेल. या सर्व सूचनांकडे आपण सकारात्मक दृष्टीने प्रतिसाद द्याल अशी खात्री आहे,'' असे राज ठाकरे आपल्या पत्रात म्हणाले.

राज ठाकरे पत्रात लिहितात की, '' 'कोविड-१९' या महामारीचा सर्वाधिक फटका महाराष्ट्र राज्याला बसला आहे. देशातील पहिल्या काही रुग्णांपैकी काही रुग्ण महाराष्ट्रात आढळले होते. तेव्हापासूनच आकडेवारी बघता, सर्वाधिक रुग्ण आणि दुर्दैवाने सर्वाधिक मृत्यूचे प्रमाण महाराष्ट्रात आहे. आज सारा देश 'कोविड-१९'च्या सावलीत तोंड देत असताना महाराष्ट्रातील परिस्थिती सर्वात बिकट आहे.

कोरोनाची पहिली लाट, त्यानंतर लावण्यात आलेले 'लॉकडाऊन' यामुळे महाराष्ट्राचे अतोनात नुकसान झाले. याचे आर्थिक, सामाजिक पडसाद अर्थातच मोठ्या प्रमाणात देशभरात उमटले आहेत. कोरोना संसर्ग रोखण्यासाठी वारंवार निर्बंध लावणे किंवा 'लॉकडाऊन' जाहीर करणे, हा पर्याय महाराष्ट्राला परवडणारा नाही. या पार्श्वभूमीवर कोरोनाच्या संसर्गाला तोंड द्यायचे असेल, तर १०० टक्के लसीकरण करणे गरजेचे आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी, विशेषत: कमी कालमर्यादेत आवश्यक तेवढ्या लसी पुरवण्यासाठी, महाराष्ट्राला केंद्राची मदत आवश्यक आहे.''

स्वतंत्र लसखरेदीची परवानगी द्या : राज

''राज्यातल्या खासगी संस्थांनाही लसी खरेदी करता याव्यात. 'सीरम'ला महाराष्ट्रात मुक्तपणे; पण योग्य नियमन करून लसविक्रीची परवानगी द्यावी. लसींचा पुरवठा वेळेत व्हावा म्हणून महाराष्ट्रातील 'हॉफकिन' व 'हिंदुस्थान ऑण्टिबायोटिक' सारख्या इतर संस्थांना लस उत्पादन करण्यासाठी मुभा द्यावी. 'कोविड-१९' रोगाचा उपचार करण्यासाठीच्या आवश्यक औषधांचा पुरेसा पुरवठा राज्यात असावा म्हणून राज्याला आवश्यक पावले उचलण्यासाठी मोकळीक देण्यात यावी'' असे राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे.

'रेमडेसिविर'चा काळा बाजार रोखण्यासाठी दोन पद्धतीने वाटप

मुंबई : राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा उद्रेक झाल्यानंतर मोठ्या संख्येने रुग्णवाढ झाली. त्यामुळे बेड, व्हेंटिलेटर, 'आयसीयू' बेडबरोबरच 'रेमडेसिविर' इंजेक्शनचा तुटवडा निर्माण झाला होता. त्यातच काळा बाजारात इंजेक्शनची विक्री होत असल्याचे अनेक प्रकार राज्यात उघडकीस आले. त्यानंतर राज्य सरकारने 'रेमडेसिविर'चा काळा बाजार रोखण्यासाठी दोन पद्धतीनी 'रेमडेसिविर' वाटप करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी ही माहिती दिली.

राजेश टोपे यांच्या हस्ते जालन्यात खासगी 'कोविड' रुग्णालयांना दहा हजार 'रेमडेसिविर' इंजेक्शनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर ते माध्यमांशी बोलत होते. टोपे म्हणाले की, '' 'रेमडेसिविर' इंजेक्शनचे उत्पादन करणाऱ्या सात कंपन्यांकडून निविदा पद्धतीने 'हाफकीन' कंपनी सरकारच्या वतीने टेंडर काढून हे इंजेक्शन खरेदी करेल आणि शासकीय रुग्णालयांना पुरवठा करेल. त्याचबरोबर प्रत्येक जिल्ह्यात एक 'स्टॉकिस्ट' असणार असून, त्याला या इंजेक्शनचा पुरवठा केला जाणार आहे.''

राज्यपालांचे 'महामानवा'स अभिवादन

मुंबई, १४ एप्रिल (प्रतिनिधी): महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३०व्या जयंतीनिमित्त राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी बुधवार, दि. १४ एप्रिल रोजी चैत्यभूमी येथे डॉ. आंबेडकरांच्या अर्धाकृती पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सामुदायिक 'त्रिशरण बुद्ध वंदना' करण्यात आली.

या प्रसंगी केंद्रीय समाज कल्याण व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, पालकमंत्री अस्लम शेख, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चैत्यभूमी स्मारक समन्वय समिती'चे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह आंबेडकरी अनेक अनुयायी उपस्थित होते.

बाबासाहेबांना अभिवादन करताना राज्यपाल म्हणाले की, ''भगवान बुद्ध, महावीर यांची महानता लोकांना काही कालखंड उलटून गेल्यानंतर कळली. त्याचप्रमाणे जसा काळ लोटेल, त्याप्रमाणे सर्व जगाला डॉ. आंबेडकर यांची महानता कळेल व त्यांना जनमानसात सर्वोच्च स्थान प्राप्त होईल. प्रत्येक युगात अवतारी पुरुष जन्माला येऊन बाबासाहेबांनी समाजातील कुप्रथा नष्ट करून नव्या समाजाचे सर्जन केले आहे. सध्याच्या युगात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने एक बहुविध प्रतिभेचे धनी, अर्थशास्त्री व विविध भाषांचे विद्वान या देशात जन्माला आले. त्यांनी विविध देशांच्या राज्यघटनांचे अध्ययन करून भारताला सर्वोत्तम अशी राज्यघटना दिली. डॉ. आंबेडकर यांचे साहित्य व चरित्राचे वाचन प्रत्येकाने केले पाहिजे व त्यांच्या संकल्पनेतील भारताच्या निर्मितीसाठी काम केले पाहिजे.''

या कार्यक्रमात राज्यपालांच्या हस्ते 'काळाच्या पलीकडचा महामानव' या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर विविध मान्यवरांच्या लेखांचे संकलन असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. राज्यपालांच्या हस्ते यावेळी बौद्ध धर्मगुरूंना 'चिवरदान' (पवित्र वस्त्रदान) करण्यात आले.

बुधवारी मुंबईत ९,९२५ कोरोनाबाधित

मुंबई : मुंबई महापालिकेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार बुधवारी मुंबईतील कोरोना रुग्णांच्या संख्येत ९ हजार ९२५ रुग्णांची भर पडली आहे. मंगळवारी शहरात जवळपास दहा हजार रुग्ण आढळले होते. बुधवारी देखील हा आकडा दहा हजाराच्या आसपास होता. बुधवारी शहरात आढळलेल्या ९,९२५ रुग्णांमुळे शहरातील एकूण रुग्णसंख्या ५,४४,९४२ इतकी झाली. बुधवारी एकूण ९,२७३ रुग्णांनी कोरोनावर मात केली असून त्यांना डिस्चार्ज देण्यात आला.

सचिन वाझेवर बडतर्फीची कारवाई होणार

मुंबई : 'अॅन्टिलिया स्फोटक प्रकरणा'त अटकेत असलेला निलंबित पोलीस अधिकारी सचिन वाझे याच्यावर आता बडतर्फीची कारवाई होण्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. भा.दं.वि.मधील 'कलम ३१९(२)(ल)'नुसार वाझेला पोलीस दलातून बडतर्फ करण्याची तयारी करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी मुंबई पोलीस खात्याकडून गृह विभागाला सचिन वाझे व परमवीर सिंह यांच्याविषयीचा अहवाल पाठविण्यात आला होता. मुंबई पोलीस खात्याची प्रतिमा एखाद्या अधिकाऱ्यामुळे खराब होत असेल, तर त्याला खात्यातून बडतर्फ करण्याचा अधिकार मुंबई पोलीस आयुक्तांना आहे, त्यामुळे वाझेवर बडतर्फीच्या कारवाईची शक्यता आहे.

वाझे आधीही होता निलंबित

२०१२ घाटकोपर बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी ख्वाजा युनूस याच्या मृत्यूप्रकरणी तब्बल १७ वर्षे सचिन वाझे पोलीस खात्यातून निलंबित होता. महाविकास आघाडी सत्तेत आल्यानंतर जून २०२०मध्ये पुन्हा एकदा वाझेला मुंबई पोलीस खात्यात सामावून घेण्यात आले होते. मात्र, २५ फेब्रुवारी रोजी उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या घराबाहेर सापडलेल्या स्कॉर्पिओ गाडीतील स्फोटकांच्या संदर्भात वाझेला राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून अटक करण्यात आल्यानंतर मुंबई पोलीस खात्यातून त्याला पुन्हा निलंबित करण्यात आले होते. मात्र, आता सचिन वाझेला पोलीस खात्यातून बडतर्फ करण्याची तयारी करण्यात आली आहे.

'ऑक्सिजन'पुरवठ्यासाठी 'भाभा ॲटॉमिक सेंटर'ची मदत घेणार

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) : राज्यातील कोरोनाबाधितांच्या संख्येत रोज विक्रमी वाढ होत आहे. वाढत्या रुग्णसंख्येसोबतच आता राज्यातील आरोग्य यंत्रणांवरही प्रचंड ताण वाढत असून, रुग्णांना आवश्यक प्रमाणात 'ऑक्सिजन'पुरवठा होत नसल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर आता 'ऑक्सिजन'चा तुटवडा रोखण्यासाठी 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'ची मदत घेतली जाणार असून खासदार राहुल शेवाळे यासाठी प्रयत्नशील आहेत. 'डिपार्टमेंट ऑफ ॲटॉमिक एनर्जी'चे सेक्रेटरी आणि 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'चे चेअरमन के. एन. व्यास यांच्यासोबत यासंदर्भात प्राथमिक चर्चा झाली असून, या आस्थापनांमधील शास्त्रज्ञ, 'ऑक्सिजन'चा तुटवडा भरून काढण्यासाठी राज्य सरकारला तांत्रिक सहाय्य करण्यास तयार असल्याची माहिती खा. राहुल शेवाळे यांनी दिली आहे.

राहुल शेवाळे म्हणाले की,

''कोरोनाच्या गंभीर रुग्णांना मोठ्या प्रमाणात 'ऑक्सिजन'ची गरज भासते. मात्र, राज्यात याक्षणी 'ऑक्सिजन'चा तुटवडा असल्याची माहिती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली होती. त्या अनुषंगाने, 'भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर'च्या अधिकारी आणि शास्त्रज्ञांची भेट घेऊन यासंदर्भात तोडगा काढता येईल. हे अधिकारी राज्य शासनाला यासंदर्भात सल्ला आणि तांत्रिक मदत करण्यास अनुकूल असून, याबाबत राज्य सरकार आणि 'भाभा ॲटॉमिक एनर्जी'च्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक लवकरच आयोजित केली जाऊन 'ॲक्शन प्लॅन' तयार केला जाणार आहे.''

'आरटीई' नुसार खासगी शाळांमध्ये ६ हजार ४६३ जागा

'शिक्षणाचा अधिकार कायदा'अंतर्गत मोफत शाळा प्रवेशास सुरुवात

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी): 'शिक्षणाचा अधिकार अधिनियम – २००९'मधील बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वंचित व दुर्बल घटकांतील बालकांसाठी ३५२ पात्र खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये २५ टक्के आरक्षित कोट्यातून लॉटरी पद्धतीने प्रवेश मिळण्यासाठी दि. ३ ते ३० मार्च, २०२१पर्यंत पालकांद्वारे 'ऑनलाईन' प्रवेश अर्ज भरण्यात आले होते. बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २९० एसएसी बोर्डाच्या आणि ६२ अन्य बोर्डाच्या अशा एकूण ३५२ पात्र खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये प्रवेशासाठी सहा हजार ४६३ जागांसाठी १२ हजार ९११ अर्ज प्राप्त झाले आहेत.

कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे 'व्हिडिओ कॉन्फरन्स'द्वारे दि. ७ एप्रिल, २०२१ रोजी काढण्यात आलेल्या लॉटरीद्वारे निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रवेशप्रणालीद्वारे १५ एप्रिल, २०२१पर्यंत एसएमएस प्राप्त होतील. पालकांनी केवळ एसएमएसवर अवलंबून न राहता 'आरटीई' पोर्टलवर प्रवेश अर्जाचा क्रमांक टाकून पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रवेशाची स्थिती जाणून घ्यावी. लॉटरीद्वारे निवड झालेल्या पाल्यांच्या पालकांनी आपल्या लॉगिनवरून प्रवेशपत्राची प्रत, आवश्यक मूळ कागदपत्र व त्यांची छायांकित प्रत या सर्व कागदपत्रांची तपासणी संबंधित पडताळणी समितीकडून दिलेल्या कालावधीत करून घेणे आवश्यक आहे.

मात्र, काही कारणास्तव पालक बाहेरगावी असतील, तर त्यांनी समितीशी 'ईमेल' द्वारे किंवा 'व्हॉट्स ॲप'च्या माध्यमातून संपर्क साधावा. लॉटरीमध्ये निवड होऊनही पडताळणी समितीकडे संपर्क न साधणाऱ्या पालकांच्या पाल्याचा प्रवेश रद्द केला जाईल. तसेच एकापेक्षा अधिक प्रवेश अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशदेखील रद्द करण्यात येणार आहे. कोरोना विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, पडताळणी समितीकडे पालकांनी गर्दी करू नये. त्याचप्रमाणे शासनाद्वारे दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे, असे आवाहन महापालिका शिक्षण खात्याद्वारे करण्यात येत आहे.

प्रवेशाबाबत अडचण उद्‌भवल्यास पडताळणी समितीने किंवा शाळेने सहकार्य न केल्यास एसएसी बोर्डाच्या शाळांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका उप शिक्षणाधिकारी (खासगी प्राथमिक शाळा विभाग) यांचे कार्यालय, करीरोड, मुंबई येथील संबंधित विभाग निरीक्षक यांच्याकडे संपर्क साधावा, तसेच अन्य बोर्डाच्या शाळांसाठी शिक्षण निरीक्षक, महाराष्ट्र शासन (उत्तर, दक्षिण व पश्चिम) आणि शिक्षण उप संचालक कार्यालय, चर्नीरोड (पश्चिम) येथे संपर्क साधावा, असेही आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाद्वारे करण्यात येत आहे.

पश्चिम रेल्वे

मुंबई उपनगर सेक्शनमध्ये यूटीएस पीआरएस स्थानांवर वातानुकूलन यंत्रांची तरतूद

निविदा सूचना क्र.: ईएल ५/१/डब्ल्यू/१ दिनांक: १२.०४.२०२१. काम आणि ठिकाण: चर्चगेट ते विरार अनुभाग: मुंबई उपनगरीय सेक्शनमध्ये यूटीएस पीआरएस स्थानांवर वातानुकूलन यंत्रांची तरतूद. कामाची अंदाजित किंमत: ₹१७,४३,४१५/- ईएमडी: शून्य. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. १३.०५.२०२१ रोजी १५.३० वाजेपर्यंत, उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. १३.०५.२०२१ रोजी १५.४० वा. टीप: निविदा प्रपत्र, सुधीपत्रक आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्याकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्या. 0019

Like us on: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

प्लॅटफॉर्मवर जलद पाणी देण्याची व्यवस्था वसणिण्यासंबंधी विद्युत कामे

निविदा सूचना क्र.: ईएल ८/१५/४४/डब्ल्यू/५ दिनांक: १२.०४.२०२१. काम आणि ठिकाण: मुंबई उपनगर अनुभाग: मुंबई सेंट्रल, दादर आणि वांद्रे टर्मिनसच्या प्लॅटफॉर्मवर जलद पाणी देण्याची व्यवस्था वसणिण्यासंबंधी विद्युत कामे. कामाची अंदाजित किंमत: ₹५,१६,८८,८७०/- ईएमडी: शून्य. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. १३.०५.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत, उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. १३.०५.२०२१ रोजी १५.३० वा. टीप: निविदा प्रपत्र, सुधीपत्रक आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्याकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्या. 0020

Like us on: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

वातानुकूलन यंत्र आणि विद्युत उर्जा, वीज व्यवस्थेची तरतूद

निविदा सूचना क्र.: ईएल ८१/१/डब्ल्यू/१९ दिनांक: १२.०४.२०२१. काम आणि ठिकाण: चर्चगेट (जीएलओ इमारत): जीएलओ इमारत / चर्चगेट येथे गोडबोले हॉलच्या रिटरहर आणि कुलीकॅम्पमधे संबंधित वातानुकूलन यंत्रणा आणि विद्युत उर्जा, वीज व्यवस्थेची तरतूद. कामाची अंदाजित किंमत: ₹४९,८७,४२७/- ईएमडी: शून्य. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. १२.०५.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत, उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. १२.०५.२०२१ रोजी १५.३० वा. टीप: निविदा प्रपत्र, सुधीपत्रक आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्याकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्या. 0021

Like us on: facebook.com/WesternRly

पश्चिम रेल्वे

जगजीवन राम रुग्णालय येथे नर्सिंग आणि ॲफिलिएनस्ड वातानुकूलन संयंत्राचे सर्वसाधारण वार्षिक सेवा देखभाल कंत्राट

निविदा सूचना क्र.: ईएल/देखभाल/८१/डब्ल्यू/१९/ डब्ल्यू/१७ दिनांक: १२.०४.२०२१. काम आणि ठिकाण: जगजीवन राम रुग्णालय/मुंबई सेंट्रल: जगजीवन राम रुग्णालय/मुंबई सेंट्रल येथे २ वर्षांकरिता नॉर्मेन आणि ॲमेरशनशह विविध स्प्लनर्जिद विविध क्षमतेच्या आणि प्रकारच्या वातानुकूलन संयंत्रांच्या सर्वसाधारण वार्षिक सेवा देखभालीचे संच. कामाची अंदाजित किंमत: ₹९०,५१,८१८/- ईएमडी: शून्य. सादरीकरणाचा दिनांक आणि वेळ: दि. १२.०५.२०२१ रोजी १५.०० वाजेपर्यंत, उघडण्याचा दिनांक आणि वेळ: दि. १२.०५.२०२१ रोजी १५.३० वा. टीप: निविदा प्रपत्र, सुधीपत्रक आणि अधिक तपशील डाऊनलोड करण्याकरिता कृपया आमची वेबसाईट www.ireps.gov.in येथे भेट द्या. 0022

Like us on: facebook.com/WesternRly

नियम मोडणाऱ्यांवर कडक कार्यवाही करा

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रशासनाला निर्देश

मुंबई, दि. १४ (प्रतिनिधी) : 'गेल्या वेळेस आपण कोरोनाचा संसर्ग रोखून दाखविला होता. मात्र, आताची परीक्षा अधिक कठीण व आव्हानात्मक आहे, त्यामुळे 'ब्रेक द चेन'मधील निर्बंधांची अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याकडे सर्व जिल्हाधिकारी तसेच पोलीस यंत्रणेने लक्ष द्यावे. कोणत्याही परिस्थितीत आपल्याला गाफील राहून चालणार नाही आणि संसर्ग आणखी फैलावलेला परवडणार नाही,'' असे सांगून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यातील जिल्हा प्रशासनाला अधिक दक्ष राहण्यास सांगितले.

बुधवार, १४ एप्रिल रोजी ते सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, पालिका आयुक्त तसेच पोलीस

अधिकाऱ्यांसमवेत आयोजित बैठकीत बोलत होते. दृरदृश्य प्रणालीद्वारे ही बैठक आयोजित करण्यात आली होती. ''अंमलबजावणी करताना मनात गोंधळ ठेवू नका, स्पष्टता ठेवा,'' असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या बैठकीस महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, आरोग्यमंत्री राजेश टोपे, वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख, मुख्य सचिव सीताराम कुंटे, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, आरोग्य प्रधान सचिव डॉ. प्रदीप व्यास, मदत व पुनर्वसन प्रधान सचिव असीम गुप्ता, पोलीस आयुक्त हेमंत नगराळे, तसेच राज्याच्या व जिल्ह्यांच्या 'टास्क फोर्स'चे डॉक्टर्स आदींची उपस्थिती होती. यावेळी राज्य शासनाने दुर्बल घटकांतील व गरीब लोकांसाठी जाहीर केलेले आर्थिक साहाय्य व्यवस्थित त्यांच्यापर्यंत पोहोचावे, तसेच कोणत्याही तक्रारी येणार नाही, यादृष्टीने चांगले नियोजन करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

'पावसाळ्यापूर्वी जम्बो सुविधा तपासा, 'फायर ऑडिट' करून घ्या'

मुख्यमंत्री म्हणाले की, ''कोरोना विषाणूचे म्युटेशन झालेले आपल्याकडील नमुन्यांमध्ये आढळले आहे. गेल्या वर्षीपेक्षा संसर्गाचा वेग खूप जास्त आहे, तरुण पिढी जास्त संसर्गित झाली आहे. 'ऑक्सिजन' उपलब्ध करून घेण्यासाठी आपण युद्धपातळीवर प्रयत्न करीत आहोत. जिल्ह्यांच्या डॉक्टर्सनी बदललेल्या उपचार पद्धतीबाबत नेमकेपणाने काय करायचे ते राज्याच्या तज्ज्ञ 'टास्क फोर्स'कडून समजून घ्यावे. 'ऑक्सिजन'चा उचित व योग्य वापर तसेच 'रेमडेसिविर'संदर्भात काळजीपूर्वक पावले उचलावी लागतील. तसेच आपण उभारलेल्या जम्बो सुविधा या येणारा पावसाळा, वादळे लक्षात घेऊन सुरक्षित आहेत किंवा नाही, ते तपासून घ्यावे. सर्व रुग्णालयांचे अग्निसुरक्षा ऑडिट त्वरेने पूर्ण करून घ्यावे, यात कोणताही निष्काळजीपणा ठेवू नये. सूक्ष्म आणि लहान कंटेनमेंट क्षेत्रांकडे विशेष लक्ष द्यावे.''

VINYL CHEMICALS (INDIA) LIMITED

CIN: L24100MH1986PLC039837

Regd. Office: Regent Chambers, 7th Floor, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021. **Tel:** 2282 2708; **Fax:** 2204 3969

Website: www.vinylchemicals.com

NOTICE

NOTICE is hereby given pursuant to Regulation 29 read with Regulation 47(1) of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 that a Meeting of the Board of Directors of the Company will be held on Monday, 10th May, 2021, to consider and take on record, inter alia, the Audited Financial Results for the year ended 31st March, 2021 and to recommend dividend, if any, on equity shares of the Company.

The information contained in this notice is also available on the Company's website www.vinylchemicals.com and also on the website of the BSE Ltd. www.bseindia.com and National Stock Exchange of India Ltd. www.nseindia.com.

for Vinyl Chemicals (India) Ltd.

Place : Mumbai
Date : 15/04/2021

P.C.Patel
Secretary